
१८००
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३५५

# श्रद्धा तरंग




REFBK-0022506
REFBK-0022506

श्री चैतन्यानंद योगीराज
सोमनाथ बा. क्षीरसागर

'श्रद्धा-तरंग'

प्रकाशन दि. १६-२-१९७७

किंमत रुपये दोन फक्त

C 'चैतन्यानंद' श्री. सोमनाथ बाळशास्त्री क्षीरसागर

१४२ गोपाळ नगर, डोंबिवली पूर्व (जिल्हा ठाणे)

Pin Code : 421 201

मुद्रक :—

दि नॅशनल प्रिंटिंग ब्यूरो

३५२/५४ जगन्नाथ शं. शेट रोड,

ठाकुरद्वार, मुंबई ४०० ००२

दुरध्वनी : २५४५०३

प्रकाशक :-

'चैतन्यानंद' श्री. सोमनाथ बाळशास्त्री क्षीरसागर

'सरस्वती परमार्थ निकेतन' प्रकाशन

१४२ गोपाळ नगर, डोंबिवली पूर्व (जिल्हा : ठाणे)

Pin Code 421 201

# श्रद्धा-तरंग

ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क्र. 2365
22406
शाखा

कवी

चैतन्यानंद-श्री. सोमनाथ बाळशास्त्री क्षीरसागर




REFBK-0022506
REFBK-0022506

सरस्वती परमार्थनिकेतन प्रकाशन
सहावें-पुष्प
१९७७

१४२ गोपाळ नगर, डोंबिवली पूर्व (जिल्हा ठाणे)
Pin Code: 421 201

श्रद्धा-तरंग



कला : भाई देशपांडे



## -: अर्पण पत्रिका :-

श्री देवधर्मावर परिपूर्ण श्रद्धा, भक्ति व निष्ठा ठेवून आपले जीवन
सुखमय व पूर्ण आनंदीत करून घेऊन व माझेवर
निष्काम, निर्व्याज, निरपेक्ष निरंतर प्रेम करून
माझ्या जीवनांत परम उच्च स्थान प्राप्त
करून घेऊन माझेशी संपूर्ण
सहभागी होऊन राहणारे

**श्री. भा. गो. देशमुख**

यांना माझा **" श्रद्धा-तरंग " समर्पण**

**" सोमनाथ म्हणे माझा श्रद्धा-तरंग ।**
**आत्मसात करून घेईल अंतरंग " ॥**

आपला सर्वांचा
**सो. बा. क्षीरसागर**

दिनांक
१६-२-१९७७



श्री चैतन्यानंद योगीराज
सोमनाथ वा क्षीरसागर

# माझा श्रद्धातरंग

सन्मित्र हो,

'श्रद्धा-तरंग' पुष्प सहावें हें पुस्तक प्रकाशित होत आहे. म्हणून मला फार सुखसमाधान लाभत आहे.

'तरंग-वीणा, तरंगबोल, स्मृति-तरंग, भाव-तरंग, भक्ति-तरंग' ही पुस्तकें आपले सर्वांचे प्रेमाशिर्वादानें प्रकाशित झालेलीं आहेत. प्रत्येक पुस्तक नांवाप्रमाणें त्या त्या विषयाला अनुसरूनच पुस्तकांतील पदें भक्तिरसानें, ज्ञानरसानें, बोधरसानें, अत्यंत आत्मियतेने विशद केलेली आहेत. शिवाय नादमधुर-लहरींत व सुंदर गोडरसात गायलीं आहेत. चाली पण पदाला हल्लींच्या पद्धतीत आवड-णाऱ्या अशाच दिल्या गेल्या आहेत. लहानपनापासून तो थोरापर्यंत मनांतल्या मनांत स्वानंद घेत अमृतमय वाणीनें घोळतील व घोळत आहेत. थकल्या-भागल्या जीवाला स्फूर्तिदायक होवून वातावरण आनंदमय करणाऱ्या आहेत. अनुभवावरून आपणही जाणू शकाल व आनंद लुटाल.

त्याचबरोबर भक्तिप्रेमरसांत अनायासे सहजगत्या वरचेवर प्रगति साधून त्यांत परिपूर्ण रंगून भक्तिप्रेमरसांचा पण महान आनंद निर्माण होवून परमेश्वराच्या सान्निध्यांत स्वतःचा आत्मोद्धार स्वतःच करून घेण्याचा मार्ग पण सूलभ व सहज होत आहे.

हल्लीच्या युगांत 'नामस्मरण' सहजगत्या लाभून त्याचा महिमा या मार्गात अनायासें साधून जावून जीवनाचें सार्थक स्वार्थ व परमार्थ दोन्ही रुपांत मिळण्याचें श्रेय लाभतें. स्वस्वरूपांत अनुसंधान साधून भावपूर्ण नामस्मरणानें मन 'चैतन्यशक्तीकडे' खेंचले जातें. दुःखाचे, आपत्तीचे, देहाचे विस्मरण होवून स्थीरत्त्व साधतें व परमेश्वरी दर्शनाचा आनंद संपूर्ण लाभतो.

'श्रद्धा तरंग' पुष्प सहावे पुस्तक अशाच वरील विधानांतून प्रकाशित होत आहे.

या पुस्तकांत ‘ श्रद्धा ’ ही अवस्था काय आहे व या अवस्थेंमधून ध्येयमंदीराला जाण्याचा मार्ग कसा सुलभ असतो हे या ‘ श्रद्धा–तरंग ’ पुस्तकांत वर्णिलें आहे.

‘ श्रद्धा ’ म्हणजेच परमेश्वर ‘ मानला तर देव नाहीतर दगड ’ अशी दृढ श्रद्धा ठेवणारालाच ‘ श्रद्धेचें ’ महात्म्य कळू शकेल. सर्व भक्तिमार्गात, ज्ञानमार्गात कर्ममार्गात, योगमार्गात ‘ श्रद्धा ’ ही फार अत्यंत मोलाची महान ‘ दिव्य ’ शक्ति आहे. ज्यानें या श्रद्धेला जिंकले त्यानें सर्वस्वपणाला तर जिंकलेच पण जगालाही तो भारी राहील. परमेश्वर तर तो एकरूपच झालाय म्हणून समजावें इतकी ‘ श्रद्धेची ’ महती या ‘ श्रद्धा–तरंग ’ पुस्तकांत पद्य-रूपाने वर्णिलेली आहे.


मागील पांच पुस्तकांच्या अनुरोधाने या ‘ श्रद्धा–तरंग ’ पुस्तकाला पण भक्तगण आश्रय देतील अशी सदिच्छा निर्माण करतों व ही सेवेची माला अशीच चालण्याची संधि भक्तगणांनी द्यावी ही प्रार्थना करतों.

श्री दुर्गापरमेश्वरी कृपेने, माझे सद्गुरू प. पू. श्री दादामहाराज हिंगे नागपूर माझे पूजनीय तीर्थरूप कै. ब्रह्मश्री बाळशास्त्री रावजीशास्त्री क्षीरसागर पुणें व नुकतेच कैलासवासी झालेले माझे ज्येष्ठ बंधू ती. स्व. विद्याभूषण पद्माकर शास्त्री बाळशास्त्री क्षीरसागर, काव्य-तीर्थ, व्याकरणतीर्थ, सांख्य–तीर्थ, साहित्यरत्न पुणें तसेच कुलस्वामिनी तुळजाभवानी, श्रीरेवणसिद्ध, आदिदेवता यांच्या सर्वांच्या कृपाशिर्वादानें मला जे कांहीं सुचले तें आपल्या सर्वांना सादर केले आहे. आपण गोड करून घ्याल ही सदिच्छा. प्रत्येक पुस्तक प्रकाशित करण्याचे भाग्य मला ‘ सरस्वती परमार्थ निकेतन ’ मंडळातील कार्यकर्त्यांचे व येथे भाविकपणें येणारे भक्तजन यांच्यामुळें लाभत आहे. या सर्वांचे कृपाशिर्वाद व सदिच्छा माझ्या पाठीशीं आहेत म्हणून माझी पुस्तकें प्रकाशित होत आहेत.

मी या सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.

आपला सर्वांचा नम्र,

**चैतन्यानंद सो. बा. क्षीरसागर उर्फ अण्णा**



श्री दुर्गापरमेश्वरी माता

# अभिप्राय

एका समुद्र स्नानाने सर्व नद्यांचे स्नान केल्याचे फल मिळते त्याप्रमाणें श्री गुरूचरण कमलाचे स्मरण केले असता अखिल तीर्थांचे स्नान केल्याचे पुण्यप्रद श्रेय साधकाला मिळते. त्याचप्रमाणे जिव्हाळ्याच्या भावश्रद्धा निष्ठेने परमेश्वराचा महिमा वर्णन करणारी माझ्या प. पूज्य श्री सद्गुरू अण्णांची भजने म्हणजेच भक्तांची कल्पवल्ली कामधेनूच आहे. भजनांवलीतील शब्दन् शब्द नि अक्षर न् अक्षर सिद्धमंत्ररुपच आहे.

आजच्या धकाधकीच्या युगांत रहाणाऱ्या सामान्य मानवाला समाज-जीवनाशी समरस होताना अनेक अडीअडचणी येतात. निरनिराळे हव्यास सुटतात. त्या बंधनातून मनुष्याला सुटण्याचा मार्ग दाखविणारा प्रज्वलीत-दीप म्हणजेच आजच्या महाशिवरात्रीच्या शुभमुहुर्तावर प्रकाशित होणारा 'श्रद्धा-तरंग' हा होय. प. पूज्य श्री अण्णांनी आपल्या दिव्य व अमोघ वाणीने शब्दांना आकार देवून भक्तांना ईश्वरी भजनांत अधिक तल्लीन होऊन त्यापासून मिळणाऱ्या फलप्रातीची नजिकच्या भविष्यकाळांत तरतूद करून ठेवली आहे.

प. पूज्य श्री अण्णांची भजनावलीची पुस्तकें अतिशय श्रेष्ठ आहेत. आजच्या युगांत माणूस योग करो न करो, काहीं विशेष धर्म कर्म न करो पण जर नित्य भजने गायील्यानें त्यांचे सर्व फल पूरेपूर आपल्याला मिळेल. आजच्या काळात सर्वात सोपे परमार्थाचे साधन म्हणजेच प. पूज्य श्री अण्णांची भजनेच ही होय.

भक्तिमार्गातूनच योगमार्ग साधावा व प्रत्येकाने आत्मसुखाचा शोध घेऊन त्याचा लाभ घ्यावा, म्हणूनच की काय जगन्माता श्री दुर्गापरमेश्वरी प. पू. अण्णांच्या स्वरुपांत प्रगट होऊन त्यांच्याकडून 'तरंग वीणा, तरंग बोल, स्मृति-तरंग, भाव तरंग, भक्ति तरंग व आज प्रकाशित होत असलेले श्रद्धा तरंग' ही भजनावलीची पुस्तकें आपल्याला लाभत आहेत. यांतील भजनांच्या द्वारे त्यांचा चांगला उपयोग व्हावा व सर्वांनी त्याचा करून घ्यावा या उत्कट हेतूने याचि देहि याचि डोळा आपले जीवन सुखमय व्हावे असे प्रत्येक भक्तानें करावे असा ह्यांचा ध्यास आहे.

हेच माझे भाग्य । हेच माझे सौख्य ।
माझ्या गुरूनाथा । माझ्या सद्गुरूनाथा ।
धन्य मी लीन झालो । तुझ्या चरणी ठेविला माथा ।।

आपला

**श्री. वसंत बा. माने**

# अनुक्रमणिका


| अनुक्रम नं. | |
|---|---|
| १) | श्री गणेश |
| २) | अपना साथी |
| ३) | संशय |
| ४) | पावन |
| ५) | रामकृष्ण हरि |
| ६) | दिल के दुलारे |
| ७) | तडफना |
| ८) | हरि ॐ मंत्र |
| ९) | दर्शन |
| १०) | रामनाम |
| ११) | भलाई |
| १२) | छंद |
| १३) | देवभक्त |
| १५) | आसरा |
| १६) | श्री रेणुका देवी |
| १८) | जय अंबे |
| १९) | जागरण |
| २१) | सौख्य लाभ |
| २३) | रहीम |
| २४) | विन्मुख |
| २५) | माझा मीच |
| २६) | संतसमागम |
| २७) | अष्टांग योग |
| २८) | पंढरीनाथ |
| २९) | गोड ध्यास |
| ३०) | श्याम सुंदर |
| ३१) | आदि शक्ति |
| ३३) | देव हवा |
| ३५) | प्रार्थना |
| ३६) | मोक्ष |

दा. क. 23645
22408
ग्रंथ शाखा

# श्री गणेश

ताल

प्रथम नमोनि श्रीगणेशाला ।
आळवुनि सांग त्याला ॥ धृ ॥
सर्व ऋद्धिचा तो गणनाथ ।
सर्व सिद्धिचा तोच नाथ
भजुन पुजून सांग त्याला ॥ १ ॥
ओंकाररुपी तोच आहे ।
'अ-ऊ-म' त तोच आहे
विनवुनि सांग त्याला ॥ २ ॥
मुळाक्षरी श्रीच म्हणूनि ।
श्रीगणेश राही वदोनी ।
वंदुनि तूं सांग त्याला ॥ ३ ॥
वेदशास्त्री तोच प्रथम
पुराणांत तोच ओम
ओंकारासी सांग त्याला ॥ ४ ॥
संकटी आपत्ती तोच पाही
तारक मारक तोच राही
अर्जवुनी सांग त्याला ॥ ५ ॥
शंकर-पार्वतीचा पुत्र ।
देवदेवतांचा मित्र
वंदन करूनी सांग त्याला ॥ ६ ॥
सोमनाथ सांगे सर्वांना ।
नमोनि सर्व देवतांना
वंदन करा श्रीगणेशाला ॥ ७ ॥

२३५४
२-३-७०३



# अपना साथी

चलो मेरे भाई माताके मंदिर जाना है ॥ धृ ॥
जीधर उधर देखो अंधेरी छाया है ।
कोई मिलेना सजन ।
अंधेरी छाया सब दुनियामें है ।
क्यूं होता है तूं मगन ।
निंदभरी आँखे खोलके तुझे जाना है ॥ १ ॥
जीवनमें अपना साथी कोई नही है ।
मतलबके पुजारी है ।
मतलबकी दुनिया रंगरंगेली है ।
जगह जगह दिखती है ॥
यह सब जानकर माताके पास तुझे जाना है ॥२॥
आदिशक्तीकी आदिमाया वही है ।
यह अब तूं जान ले ।
भावभक्तीसे शरण तुझे जाना है ।
क्यूं अब रूख जाता है ।
जीवनका आनंद उसीमें अब भरा है ॥ ३ ॥
जीवनकी नैय्या भावभक्तीपर ।
पैलतिरी तुझे छोडना है ।
कांटेकुटे पथ्थर पैरोसे ठुकराकर ।
हिंम्मतसे तुझे चलना है ॥
सत्कर्म-सत्संगसे नैय्या जानेवाली है ॥४॥
माताजीकी प्रतिमा देखतेहि तुझे ।
प्रकाश हृदयमें चमके ।
आत्मज्योती देखकर समाधान तुझे ।
जीवनमें अब चमके ।
सोमनाथकी बातें सोचकर चलना है ॥५॥

# संशय

नका संशय ठेवूं मना ।
देव मज पावेल कैसा ॥ ध्रु ॥
देव आहे देवमांदिरी ।
उगीच फिरे दारोदारी ।
नेत्र लावुनि स्थीर बसा ॥ १ ॥
देव पाहा हृदयांतरी ।
एक लक्ष ठेवी अंतरी ।
मग दिसेल देव कैसा ॥ २ ॥
भावभक्तीची ज्योत लावी ।
श्रद्धेनें हो ज्योत फुलवी ।
निष्ठा ठेविता दिसे तैसा ॥ ३ ॥
पूजा-पाठ नित्य ती धरी ।
जपतप साधन करी ।
देव मग दिसेल तैसा ॥ ४ ॥
जिथें जाल दिसेल तिथें ।
जिथें पाहाल राहिल तिथें
ध्यानीं मनीं स्वप्नीं तैसा ॥ ५ ॥
प्रल्हादाने देव दाविला ।
खूण दाविता तिथें राहिला ।
अणुरेंणुत देव तैसा ॥ ६ ॥
संतमंहती या देवास
आणुनी दावी या जगास
भावभक्तीनें दिनें तैसा ॥ ७ ॥
संशयानें नाहीं हो दिसे ।
भावभक्ती ठेविता वसे
अंधश्रद्धेनें राही तैसा ॥ ८ ॥
सोमनाथ सांगे भक्तासी
अनुभव घ्यावा मनासी
संशय फिटे पावे कैसा ॥ ९ ॥

# पावन

पावन करी मजसी ।
घेवुनि मज तव चरणासी ॥ घृ ॥

बहु तापानें ग्रासलो आई ।
नच सोडीन चरण मी माई ।
कोण तारी तुजवीण मजसी ॥ १ ॥

तुझें नामें दुःख विसरतें ।
भयभीती बाधा नच उरते ।
पावन तूंच भक्ता करसी ॥ २ ॥

तुझें नामें रोगराई जाते ।
दारिद्र संकट दूर होतें ।
शांति मनाला बहु वाटते ॥ ३ ॥

बहु अपराध असतील ।
जीवनी चुका बहु दिसतील ।
संभाळून घेसी तूं सर्वांसि ॥ ४ ॥

तारक मारक तूंच जीवनी ।
रक्षण आतां घेई करूनि
सोमनाथ प्रार्थी चरणाशी ॥ ५ ॥

# रामकृष्णहरि

ताल

रामकृष्ण नाम सदा बोला मुखी
सुखाचा संसार त्याचा हो जीवनी ॥ ध्रु ॥

मन सदा ठेवी दुःखी कष्टी ध्यानी ।
कैसी सुख शांती त्याचे लागे कानीं ॥१॥

नित्य स्मरे हरि श्रवण कीर्तनीं ।
त्याची रसना हो रंगली चितनीं ॥२॥

हरिनाम गंगा ठेवी रात्रंदिनी ।
कधी भयभीती बाधा नको मनी ॥३॥

कितीतरी संत नामस्मरणानी ।
सुखासुखी गेले जीव उद्धरूनी ॥४॥

हास्य मुखी ठेवी सदा हो नामानी ।
सुखशांती लाभे त्याचे हो जीवनी ॥५॥

दुःख कष्ट भोग रोग हो जीवनी ।
दूर करा मनी नका ऐकूं कानी ॥६॥

श्रद्धा भाव भक्ति रामकृष्ण ध्यानी ।
सुखाचा संगम मिळेल जीवनी ॥७॥

सोमनाथ सांगे आळवावा मनी
रामकृष्णहरि गोविंद जीवनी ॥८॥

# दिलके दुलारे

ताल

भक्तोके प्यारे दिलके दुलारे।
मेरे सदनमें जल्द आना ॥ धृ ॥

याद तुम्हारी दिलमें हमेशा।
चढ गयी अब भक्तीकी नशा।
आवाज सुनते दौडके आना ॥ १ ॥ मेरे०

दर्शनकी प्यासी दिलमें लगी।
करदो हमारी अब सलगी।
तमन्ना मेरी पुरी करना ॥ २ ॥ मेरे०

जीवन सहारा तुम हो मेरा।
प्रीतका आनंद हमेशा तेरा।
आवो प्यारे "सदानंद" सदना ॥ ३ ॥ मेरे०

कहते दुनिया दयाका सागर।
बन जावो अब शांती सागर।
दर्शनकी प्यासी बुझा तो देना ॥ ४ ॥ मेरे०

तेरे बीना नहीं कोई हमारा।
भक्तोकी याद तुम बनो निवारा।
सोमनाथ की सेवा मंजूर करना ॥ ५ ॥ मेरे०

# तडफना

ताल

हरि ॐ हरि ॐ हरि ॐ हरि ॐ हरि ॐ ।
जब याद तुम्हारी आती है।
नयनोसे आँसूं बहती है ॥ धृ ॥

हरि दर्शनको मन हमेशा।
बार बार तडफत दिनेशा।
एक बार तो आँसूं बुझा देना ॥ १ ॥ नय०

गीत तुम्हारा हमेशा गाऊं
ग्यान तुम्हारा हमेशा पावूं
जीवन मेरा तडफ रहा है ॥ २ ॥ नय०

बने गये तुम हो मेरे योगी।
बन जावूं अब मैं तुम्हारा जोगी
मोहब्बतकी प्यासी लगी है ॥ ३ ॥ नय०

दिलका चांद तुम बनो मेरा ।
बन जावूं अब प्रकाश मैं तेरा
कैसे बतावूं प्रीत ये क्या है ॥ ४ ॥ नय०

दुनियाके मालीक तुम तो बने।
दास चरणोका हम तो बने
दर्शनकी झलक तुझे देना है ॥ ५ ॥ नय०

सोमनाथकी याद अब तो लेना।
आसूं मिटाकर दर्शन तो देना।
भक्तीप्रेमसे सब तुझे देना है ॥ ६ ॥ नय०

# हरि ॐ मंत्र

ताल

हरि ॐ हरि ॐ हरि ॐ वदतां ।
काया झिजवावी मंत्र हा म्हणता ॥ ध्रु ॥

निर्माता सृष्टीचा हरि ॐ आहे ।
पालनपोषणी हाच मंत्र राहे ।
मंगल कार्यांत हाच हो पाहता ॥ १ ॥ काया०

वेदाचे हो मूळ हरि ॐ वसे ।
पुराणांत हाच अग्रभागी दिसे ।
शास्त्राची महती दिसे हो बघतां ॥ २ ॥ काया०

हरि ॐ ध्वनी जागृतीचें स्थान ।
हरि ॐ मनी आत्मिक हो ज्ञान ।
घडेल सदा हो जप हा करतां ॥ ३ ॥ काया०

निराकार हरि ॐ सदा हो वदतां ।
साकारांत आल्या सर्व हो देवतां
प्रणवाचा मंत्र हरि ॐ करतां ॥ ४ ॥ काया०

साधुसंत महंती याच हो मंत्रांनी
योगयोगेश्वर याच साधनानी
जीवनी तरले हरि ॐ म्हणतां ॥ ५ ॥ काया०

सोमनाथ सांगे हरि ॐ म्हणतां ।
भक्त जाती तरुन मंत्र हा वदता
अनुभव येई जीवनी हो करतां ॥ ६ ॥ काया०

# दर्शन

ताल

दर्शन कधी देणार आई, दर्शन कधी देणार ॥ धृ ॥
तळमळ जीवनी लागे। तृप्त कधी करणार आई ॥ १ ॥
दैवयोगे प्रपंचि झालो। कधी तूं सोडवणार आई ॥ २ ॥
मायाममता जीवा लागे। कसा मी सुटणार आई ॥ ३ ॥
हृदयमंदिरी केली तयारी। येण्या वाट बघणार आई ॥ ४ ॥
पंचप्राणांची ज्योत लावी। रुप तुझे बघणार आई ॥ ५ ॥
आत्मसुखाची माझी तृप्ती। पूर्ण कधी करणार आई ॥ ६ ॥
भक्तगण दरबारी आले। दर्शना घाई करणार आई ॥ ७ ॥
सोमनाथ प्रार्थी तुजला। आशिर्वादे तुज विनविणार आई ॥ ८ ॥

# रामनाम

केव्हां मला दर्शन देशील ।
माझ्या जिवलगा रघुनंदना ॥ धृ ॥

तन मन धन अर्पिले मी चरणी ।
रात्रंदिन ध्यास लागे वंदना ॥ १ ॥

नाम तुझे घेतो पळे सारी व्याधी ।
आनंदचि लाभे सदा माझे मना ॥ २ ॥

पुर्वपुण्याईने तुझी कृपा झाली ।
सदा चाले मुखी रामनाम ध्याना ॥ ३ ॥

राम राम राम मनाचा हा ध्यास ।
पावन करूनी टाळील यातना ॥ ४ ॥

भारावुनी गेलो राम या नामानी ।
आता नाहीं राही दुजी ती वासना ॥ ५ ॥

सोमनाथ म्हणे माझ्या रामराया
करी कृपा आतां सर्व भक्तगणा ॥ ६ ॥

卐 卐 卐

# भलाई

कवाली　　　　　　　　　　　　ताल

कभी ना कभी तुमको हंसना पडेगा।
भगवानकी माया लुटाना पडेगा ॥ धृ ॥

दुनियाका मालीक सबसे तो वही है।
जीवनका साथी अब तो मिला है।
उसीके बिगर कैसे रहना पडेगा ॥ १ ॥

हंसते हंसते दिन बिताना ही होगा।
भगवानकी याद हमे लेना होगा।
तभी अपनी नैय्या पारही पडेगा ॥ २ ॥

रोनेसे कुछ भी होनेवाला नही है।
साथी उनका रहनेवाला नही है।
रोते रोते जीवन मिटाना पडेगा ॥ ३ ॥

आखिर समयपर आधार तो वही है।
बचानेवाला अपना तो वही है।
भक्तोपर रहीम करना ही पडेगा ॥ ४ ॥

जीवनकी लढाई कांटेकुटोपर।
चलतेही चलते उसीको हटाकर।
हिम्मतसे तुमको चलना ही पडेगा ॥ ५ ॥

सोमनाथ कहता है अब भक्तगणको।
हंसते हंसते शरण जावो भगवानको।
हमेशा भलाई उसीमे मिलेगा ॥ ६ ॥

## छंद

ताल

देवा मला तुझा छंद । लागे मजला फार ॥ ध्रु ॥

मन माझे तुझे चरणी । रंगुनी सदा जाई ।
नाहीं राही मज भान ॥ १ ॥

काळ वेळ सदा राही । रात्रंदिन ध्यान होई ।
हरपुनी देहमान ॥ २ ॥

नाम तुझे ध्यानी मनी । नयनी अश्रु येई ।
सुटे माझे अवधान ॥ ३ ॥

गुणगान गातो मनी । जपाची सदा घाई ।
करी मज समाधान ॥ ४ ॥

मज एक ध्यास मनी । दर्शन कधी देई ।
माझे तृप्त होईल मन ॥ ५ ॥

सोमनाथ तुज विनवी । येण्याची कर घाई ।
भक्तांना देई दर्शन ॥ ६ ॥

卐 卐 卐

# देवभक्त

भावगीत ताल

कृष्ण तुझी मुरली रे गोड ।
खेचून घेतें माझे ध्यान ॥ धृ ॥

दारी सडा-मार्जनाचे वेळी ।
मधुर नाद घुमे जवळी ।
देहभान जाई हरपून ॥ १ ॥ खेचून

कामधंदा करण्याची घाई ।
दुध लोण्याची आठवण येई ।
केव्हां डोळे भरून घालीन ॥ २ ॥ खेचून

शेजारी पाजारी वदे वेडी ।
घनश्यामास बहु आवडी ।
घरादाराशी जाईल सोडून ॥ ३ ॥ खेचून

अन्नपाणी नाही गोड लागे ।
धांव घेते मन वेगे वेगे ।
जाशील का रे मज घेवून ॥ ४ ॥ खेचून

तुझ्या रुपांत माझे स्वरूप
राहूं दे सतत एकरूप
तुझे माझे आनंदी मिलन ॥ ५ ॥ खेचून

नको छेडूं आतां मज भारी
भटकेन मग दारोदारी
घेई आतां मज सांवरून ॥ ६ ॥ खेचून

संचिताची ही अपुली गोडी ।
राधाकृष्णाची जमली जोडी ।
परंपरा ही घेई साधून ॥ ७ ॥ खेचून

राधावांचून सखा हा कृष्ण
म्हणतील राधाकृष्ण कोण
निसर्गाची जाईल मग शान ॥ ८ ॥ खेचून

जीथे कृष्ण तीथें राही राधा ।
कधी न मग राहील बाधा ।
मनोभावें चालेल पूजन ॥ ९ ॥ खेचून

सोमनाथ सांगे भक्तांजनी ।
मतीतार्थ घ्यावा हो कानी ।
देवभावास करा हो वंदन ॥ १० ॥

# आसरा

ताल

देई मला तव आसरा
ठेवु नको मज तूं अंतरा ॥ धृ ॥

जैसा सुवास अत्तराचे ठायी ।
देहभान मग हरपूनी जाई ।
तैसा माझ्या जीवा देई मज थारा ॥ १ ॥

दीपज्योती सदा असे तुझे ठायी ।
सदा मी राहीन तुझेच पायी ।
चमकुनी सदा प्रकाशांचा फेरा ॥ २ ॥

अमृताची गोडी जैसे तुझे ठायी ।
खेळवीन माझ्या रोमरोमा ठायी ।
सोडूनि हृदयी गोडीचा पसारा ॥ ३ ॥

सोमनाथ बोले मधुमिलनी गोडी ।
ठेवीन हृदयी जीवाशिवा जोडी ।
अभय देवूनि मज आतां तारा ॥ ४ ॥

卐 卐 卐

# श्री रेणुका देवी

ताल

जय जय जय रेणुकादेवी ।
वास तुझा माहूर गडावरी ॥ धृ ॥

त्रिभूवनाची तूंच स्वामिनी ।
भक्तांची होसी वरदायीनी ।
करुणा करी जगतावरी ॥ १ ॥

मूळ पिठाची तूं जगदंबा ।
भक्तांची झालीस कालीअंबा ।
दर्शनास येती गडावरी ॥ २ ॥

माता होशी भार्गवरामाची ।
वल्लभा होशी जमदग्नीची ।
हांक देता प्रगटे गडावरी ॥ ३ ॥

लावण्यरुप सुंदर नयनी ।
वर्णिले मुनी देवदेवांनी ।
मुखी तांबूळ सदा धरी ॥ ४ ॥

साडी पिवळी भरजरीची ।
टिळा कुंकूम वेणी पिळेची ।
अंगीतंग चोळी दिसे अंजिरी ॥ ५ ॥

रत्नहार मणी अंगावर ।
विविध सुवर्ण अलंकार ।
घालुनि बैसली सिंहावरी ॥ ६ ॥

पायी पैंजण घणघणती ।
हाती कंकण खणखणती ।
सप्तशती पाठ भक्त करी ॥ ७ ॥

तुळजापूर नि कोल्हापूर ।
सप्तशृंगी गड तो माहूर ।
वास साडेतीन पिठावरी ॥ ८ ॥

अनाथाची तूंच जगदंबा ।
वदे तुज भक्त अंबा अंबा ।
शरणांगती घेती गडावरी ॥ ९ ॥

सोमनाथ आला भक्तागणी ।
मस्तक ठेवी तुझे चरणी ।
कृपाशिर्वाद ठेवी भक्तावरी ॥ १० ॥

# जय अंबे

ताल

जय अंबे जय अंबे । मुखी येवूं दे ।
मूर्ति तुझी हांसरी ती । नयनी पाहूं दे ॥ धृ ॥

सकळ जगाची माता तूं । चिंता वाही भक्तांची तूं ।
घेसी धांव झणी तूं । दृष्टी पाहूं दे ॥ १ ॥

अष्टभुजा अष्ट दिशासी । शस्त्रे धरूनि ठेविसी ।
रक्षणा उभी भक्तांसी । नयनी पाहूं दे ॥ २ ॥

सिंह तुझा भयानक तो । दशदिशासी गर्जुनी तो ।
साथ देई तुजसी तो । गर्जना ऐकूं दे ॥ ३ ॥

वास तुझा चौदा भुवनी । भक्ता रक्षसी दुष्टापासूनि ।
किर्ती तुझी त्रिभुवनी । कानी ऐकूं दे ॥ ४ ॥

नाद मधुर नुपुरांचा । हिरवा शालु भरजरीचा ।
भांगी मोती चुरांचा । रुप पाहूं दे ॥ ५ ॥

अंबा दुर्गा चामुंडा तूं । नवदुर्गा राहसी तूं ।
मज दर्शन देई तूं । नयनी दिसूं दे ॥ ६ ॥

सोमनाथ म्हणे तुजला । माय माऊली तूं मजला ।
कृपेची साव्रुली सकला । सतत राहूं दे ॥ ७ ॥

卐 卐 卐

# जागरण

मल्हारी मार्तंड खंडेराया ।
जागराला या या ॥ धृ ॥

भावभक्तीची ज्योत ही केली ।
हृदयाच्या दीपांत लावली ।
भावनेचा दिला हा आधार ।
जागराला या या ॥ १ ॥

गडामाजी तुझा हा गड ।
नवलाख पायरीचा हा दगड ।
चढून भक्त येती गडावर
जागराला या या ॥ २ ॥

भंडार खोबऱ्याची बहु आवड ।
उधळती चोकांत धडाधड ।
करूनी गर्जना ती अपार
जागराला या या ॥ ३ ॥

हळदी या मायेचा अलंकार ।
सर्वांगावर होती वरवर ।
सदानंदाची गर्जना ती फार ।
जागराला या या ॥ ४ ॥

ऋषीजनांचा छळ हा झाला ।
रक्षणापायी त्यांचा धांवला ।
दुष्टजणांचा करूनी संहार ।
जागराला या या ॥ ५ ॥

मल्लासूर हा बहु मातला ।
सज्जनांचा छळ हा केला ।
वध करून त्यास केले ठार ।
जागराला या या ॥ ६ ॥

मार्तंड म्हणे सदाशिव तुजला ।
असुरांच्या युद्धांत पडला ।
म्हणून घेतला तूं अवतार
जागराला या या ॥ ७ ॥

सदानंदाचा सोहळा तुजला ।
भक्तजनांचा मेळा भरला ।
उधळीला चहुंकडे भंडार ।
जागराला या या ॥ ८ ॥

शिवाचा तुझा हा अवतार
खंडेराव हा वदला म्हणून
भक्त करी हो जयजयकार
जागराला या या ॥ ९ ॥

सोमनाथ हा तुझ्या दरबारी ।
भक्त गणांसह करितो वारी ।
बोलून खंडेरावाचा जयजयकार ।
जागराला या या ॥ १० ॥

卐 卐 卐

# सौख्यलाभ

भावगीत ताल

सौख्य वाट्या आले तुझी प्रीत गाता ।
माझ्या शिवराया माझ्या शिवराया ॥ धृ ॥

चालता, उठता, हंसता, बोलता ।
ध्यानी मनी स्वप्नी नाम येते सदा ।
हेंच माझे भाग्य हेंच माझे सौख्य ।
माझ्या शिवराया माझ्या शिवराया ॥ १ ॥

संचिताचे योगे पूर्वपुण्य योगे ।
सत्कर्म सत्संग सदा ही घडते ।
हेंच माझे भाग्य हेच माझे सौख्य ।
माझ्या शिवराया माझ्या शिवराया ॥ २ ॥

द्वैतामधुनीच अद्वैतात आलो ।
जीवा शिवामाजी एकरूप झालो ।
हेंच माझे भाग्य हेंच माझे सौख्य
माझ्या शिवराया माझ्या शिवराया ॥ ३ ॥

सौभाग्याचा टिळा लाविला कपाळी ।
भाग्योदय माझा झाला वेळोवेळी ।

हेंच माझे भाग्य हेंच माझे सौख्य ।
माझ्या शिवराया माझ्या शिवराया ॥ ४ ॥

सोमनाथ तुझा करी नमस्कार ।
सर्व भक्तगणां राहू द्या आधार ।
हेच माझे भाग्य हेंच माझे सौख्य ।
माझ्या शिवराया माझ्या शिवराया ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

# रहीम

रहीम करनेवाला । पुकार सुनते आना ।
अब भूल मत जाना । कोई नहीं मुझे ठिकाना ।। घृ

अज्ञानी बालके हम । आधार तुम्हारा देना ।
निद्में सो गये हम । यह नही भूल जाना ।। १ ।।

कुद्रतसे हम भुले । तुम याद् तो दिलाना ।
सत्संगकी नैय्या देकर । जीवन उद्धार करना ।। २ ।।

बुरायी को तुम हमारे । सब भूल तुम जाना ।
अच्छी दुवा ही देकर । हमको अब निभाना ।। ३ ।।

अंधेरी छाया पडी है । मुष्कील है अब चलना ।
रहीम सबको करके । उजाला देकर जगाना ।। ४ ।।

शिवजीका सोमनाथ । करता है अब प्रार्थना ।
सब प्रेमी भक्तगणको । रहीम करके बचाना ।। ५ ।।

卐 卐 卐

# विन्मुख

देवाचिया प्रीतीसाठीं । कांरे धरी आतां लाज ।
नको होवूं तूं विन्मुख । ठेव चित्त भगवंत ॥ धृ ॥

माय बाप बंधू जन । इष्टमित्र आप्तगण ।
पाहा देवाचिया ठायी । सर्वा ठायी हा अनंत ॥ १ ॥

तीर्थक्षेत्री त्याचा वास । पाहा तेथें हो जावून ।
भावभक्ति श्रद्धा निष्ठा । ठेवुनिया हृदयांत ॥ २ ॥

योगी जपी तपी संत । यांच्या ठायी आहे तोच ।
आत्मसात तें करून । सदा रहा तूं जागृत ॥ ३ ॥

अहर्निश नाम घ्यावे । देवादिकांचे सतत ।
मनोभावे पुजनाने । आळवावे पठणांत ॥ ४ ॥

आपणच दुःखी होतो । आपल्याच कारणांत ।
अनुभव न हो घेता । निराश होतो मनांत ॥ ५ ॥

भाव श्रद्धा निष्ठावीण । नामसंकीर्तनावीण ।
आत्मजागृतीचे वीण । कैसा मिळेल हो अनंत ॥ ६ ॥

तुज आहे तुजपाशी । परि तूं विसरलासी ।
पाहूं जाता तूं शोधूनी । दिसेल हो भगवंत ॥ ७ ॥

देवाचिया द्वारी जाता । नका धरू लाज काज ।
निर्मळ मन ठेविता । मुक्ति मिळेल जन्मांत ॥ ८ ॥

सोमनाथ सांगे सर्वां । पाहा हा योग साधून ।
अनुभव हा घेऊनी । मिळवा हा भगवंत ॥ ९ ॥

# माझा मीच

**अभंग**

माझा मीच भक्त । माझा मीच देव ।
जीवाचा शिवाचा । समभाव ॥ धृ ॥

जन्मा आला जीव । त्यात आला शिव ।
दोघांचे मिलन । एक भाव ॥ १ ॥

आत्मा परमात्मा । दोन्ही ही एकच ।
अणु नि रेणुचा । फरकच ॥ २ ॥

जीवाशी येई हो । शिवपण ते हो ।
'ज' 'श' अक्षराचा । फरक हो ॥ ३ ॥

'ज' हाचि जन्माचा । 'शि' हा शिवणाचा ।
जन्म मरणाच्या । शिवणाचा ॥ ४ ॥

जन्माचे सार्थक । शिवणपणांतच ।
साधुनि जाईल । कर्मातच ॥ ५ ॥

जीवाच्या शिवाच्या । पडतांच गांठी ।
टळेल जन्माच्या । व्याधी पाठी ॥ ६ ॥

योगी जपी तपी । संत नि महंत ।
तुम्हां दिसेलची । पुराणांत ॥ ७ ॥

सोमनाथ सांगे । दूर न हो जातां ।
मिळे परमात्मा । पाहूं जाता ॥ ८ ॥

# संतसमागम

अभंग

सोनियाचा दिन । आज उगवला ।
संतसमागम । मज लाभे ॥ धृ ॥

संताच्या संगती । जळतील पापें ।
शुद्ध मन होई । पुण्य लाभे ॥ १ ॥

संताच्या संगती । वासनेचा क्षण ।
निघुनी जाईल । सुख लाभे ॥ २ ॥

संताच्या संगती । ज्ञानाचा तो मार्ग ।
आत्मज्ञान सुख । ज्ञान लाभे ॥ ३ ॥

संताच्या संगती । सुखाचा सागर ।
आनंदी आनंद । मना लाभे ॥ ४ ॥

संताच्या संगती । शेजार घडता ।
हरिनाम गंगा । सदा लाभे ॥ ५ ॥

संताच्या संगती । मन विष बाधा ।
कदापी शिवील । शांति लाभे ॥ ६ ॥

सोमनाथ सांगे । संताच्या संगती ।
धरुनिया सदा । मोक्ष लाभे ॥ ७ ॥

卐 卐 卐

# अष्टांग योग

अभंग

भावे पाहा देव । माये कौतुकाचा ।
श्रद्धेनें जिंकावा । कल्याणाते ॥ ध्रृ ॥

न लागे सायास । न लागे सामुग्री ।
ठेवा शुद्ध मन । भक्तिभावे ॥ १ ॥

यमनियमांची । राखावी बंधने ।
अष्टांग योगांची । पाळी तत्त्वें ॥ २ ॥

षड्रिपु होळी । समाधानी झोळी ।
करा वेळोवेळी । समभावें ॥ ३ ॥

भोळीभाळी भक्ति । अंतर्यामी शक्ति ।
वाढेल प्रगती । सर्वाबोधें ॥ ४ ॥

भावभक्ति श्रद्धा । सदा हो ठेविता ।
ठाके देव उभा । समाधानें ॥ ५ ॥

भावानें तरलें । श्रद्धेने जोडले ।
भक्तिने नमलें । देवादिकें ॥ ६ ॥

काय सांगू आता । भावभक्ति श्रद्धा ।
शब्द हा अपुरा । माहिमाने ॥ ७ ॥

सोमनाथ सांगे । घ्यावा अनुभव ।
भावाचा हा देव । पाहण्यातें ॥ ८ ॥

卐 卐 卐

# पंढरीनाथ

पंढरीचा विठ्ठल भोळा ।
भक्तासंगे नाचतो सदा ॥ ध्रु ॥

भावभक्तिचा हा भुकेला ।
श्रद्धा निष्ठेस हा भाळला ।
हांक मारिता येई तो सदा ॥ १ ॥

आषाढी कार्तिकी यात्रेला ।
वारकरी भक्त गणाला ।
ठायी ठायी दिसे हा सदा ॥ २ ॥

दिंड्यापतांकांचे नादांत ।
टाळमृदुंग आवाजात ।
विठ्ठलाचा नाद कानी सदा ॥ ३ ॥

रुप पाहतां विठ्ठलाचे ।
तेज सहस्त्र किरणांचे ।
दिसे अवलोकिता हा सदा ॥ ४ ॥

विठ्ठलाची मूर्ति सांवळी ।
आपणा करिती जवळी ।
हांस मुखी ठेवुनि सदा ॥ ५ ॥

सोमनाथ सांगे भक्तांस
ऐशा त्या पंढरीनाथास
नमावे चरणी हो सदा ॥ ६ ॥

# गोड ध्यास

अभंग

सदा माझे डोळा । दिसे तुझे रूप ।
पाहोनिया मन । हरपतें ॥ धृ ॥
चित्ति वसे तुझे । सुंदर ते ध्यान ।
माझे मन पूर्ण । सुखवितें ॥ १ ॥
मूर्ति तुझी मनी । येई माझें ध्यानी ।
तुझ्याविण आई । कोण येते ॥ २ ॥
सिंहावरी कैसी । येवूनि बैसली ।
हाती शस्त्रें घेसी । रक्षणातें ॥ ३ ॥
मळवट भाळी । मुकुट मस्तकी ।
हिरवी ती साडी । नयनी तें ॥ ४ ॥
कंठी रत्नमाला । गळी तो शोभला ।
कंकणे हातांत । खणखणतें ॥ ५ ॥
नुपूर पायांत । चाल आवाजांत ।
मधुर नादात । घणघणतें ॥ ६ ॥
सज्जनांची रक्षा । दुर्जनाची हत्या ।
गर्जना विश्वाच्या । ऐकविते ॥ ७ ॥
त्रिभुवनामाजी । वास तुझा राही ।
आनंदी आनंद । करावितें ॥ ८ ॥
कोण भाग्यवंत । तुझ्या स्वरूपांत ।
राही अखंडीत । अनुग्रहातें ॥ ९ ॥
नवदुर्गा राही । तुझ्या ठायी ठायी ।
दुर्गा लक्ष्मी काली । आणिकतें ॥ १० ॥
बाळ सोमनाथ । लागे चरणांस ।
होई कृपावंत । भक्तांगणते ॥ ११ ॥

# श्यामसुंदर

दरबारी कानडा

हे श्यामसुंदरा हे गोविंदा ।
मधुसूदना मनमोहना ॥ धृ ॥

तुझ्या पदी माझा सकळ जन्म ।
सुखावला आता अनुपम ।
शरण शरण तुला तन मना ॥ १ ॥

पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश ।
सर्वाठायी राही तुझा अंश ।
विश्वरूप पाही माझ्या मना ॥ २ ॥

चराचरी तूं व्यापूनि उरला ।
तुझ्या स्वरूपी जीव हा रमला ।
मोहनी जडली याच कामना ॥ ३ ॥

गोकुळ मथुरा खेळखेळसी ।
रक्षणा धांवला बाळगोपाळासी ।
अवतरला तूं काली मर्दना ॥ ४ ॥

दुष्टांसी दुष्टपणां करुनी ।
सज्जनासी सज्जन होवूनि ।
खेळखेळलासी जनार्दना ॥ ५ ॥

सोमनाथ म्हणे माझ्या कन्हैया ।
भक्तगणा देई तूं अभया ।
रक्षणा त्यांच्या जाग तनमना ॥ ६ ॥

# आदिशक्ति

धांवत ये लवकरी ।
माझे तुळजापुरचे आई ॥ धृ ॥

तुजवीण मज नाहीं आसरा ।
कल्पना वाही सदा गरगरा ।
येण्याची कर तूं घाई ॥ १ ॥ माझे

अलंकार वस्त्रे अंगी घालुनी
सिंहावरती स्वारी करूनि
पैंजण घालून येई ॥ २ ॥ माझे

माय भवानी तूं जगदंबा ।
भक्तांची झालीस तूं अंबा ।
सोनियाचा दिन दावी ॥ ३ ॥ माझे

आम्ही अनाथ दीन भिकारी ।
सेवेची करतो सदा चाकरी ।
सेवा करूनि घेई ॥ ४ ॥ माझे

चैतन्याची ही ज्योत लाविली ।
हृदयाच्या दीपांत जाळिली ।
भावनेची वात केली ॥ ५ ॥ माझे

गुणगानी मी सदा रंगीन ।
डोळे भरून तुला पाहीन ।
भक्तांसी पाखर घाली ॥ ६ ॥ माझे

प्रीति सदा करी गांजल्यावरी ।
दुःखीतांची चिंता दूर करी ।
मायेचे पांघरुण घाली ॥ ७ ॥ माझे

कामक्रोधाची होळी करुनी ।
मन बुद्धि चित्त स्थिर करुनी ।
अहंकाराचा नाश करी ॥ ८ ॥ माझे

भावभाक्तिश्रद्धा निष्ठाचे पायी ।
सदा राहीन चरणी मी आई ।
कृपेची पाखर घाली ॥ ९ ॥ माझे

अंबा दुर्गा चांमुडा तूंच गौरी ।
नवसाला पावतीस भारी ।
पावन करुन घेई ॥ १० ॥ माझे

आदिशक्तिची आदीमाया तूं ।
कृपा करी आता भक्तांवरी तूं
सोमनाथ तुला प्रार्थी ॥ ११ ॥ माझे

卐 卐 卐

# देव हवा

मज देव दावा मज देव हवा ।
कुठेंच बसतो कुठेच रमतो ।
पाहुनि मज सांगा ॥ धृ ॥

संत म्हणती तुझ्या जवळी आहे ।
हृदयामाजी वस्ती त्याची आहे ।
दृष्टि अंतर्यामी लावुनी पाहे ।
सांपडेल तुज धागा ॥ १ ॥

मन बुद्धि चित्त करूनी स्थीर ।
काम क्रोध मद लोभ नि मत्सर ।
नायनाट करा सदा अहंकार ।
सांपडेल तुज धागा ॥ २ ॥

अष्टांगयोगाची पाळा सुत्रे सदा ।
नियमांनी वागा सदा नि कदा ।
बंधनें घाला शरिरी अनेकदां ।
सांपडेल तुज धागा ॥ ३ ॥

प्रीति सदा ठेवा गांजल्यावरी ।
अनाथांची सेवा करा त्या परी ।
भक्ति, श्रद्धा, निष्ठा ठेवा देवावरी ।
सांपडेल तुज धागा ॥ ४ ॥

भजन-पुजनानें मन शुद्ध ठेवा ।
निष्कामपणें दुःखितांची सेवा ।
तेव्हां साधेल तुमचा दावा ।
सांपडेल तुज धागा ॥ ५ ॥

स्थितप्रज्ञावीण कैसा हो मिळेल ।
वासना ठेवा ही शुद्ध बुद्धितील ।
देवरायासाठीं मार्गानें जातील ।
सोमनाथ सांगे मिळे हा देवा ॥ ६ ॥

# प्रार्थना

नमन हें प्रथम तुला अंबे ।
ठेवुनि मस्तक तुझे चरणाला ॥ ध्रु ॥

धन्य झाली या त्रिभुवनांत ।
धाके तुझ्या रिपु पळतात ।
सूर हे येती तव पुजनाला ॥ १ ॥

तुझाचि आश्रय हा भक्तांना ।
आणिक नाहीं दुजा सर्वांना ।
दुःख हरूनी धांवे रक्षणाला ॥ २ ॥

लज्जा समस्त भक्तगणांची ।
मावुली म्हणुनी माया सज्जनांची ।
अभया देवुनी लावी चरणाला ॥ ३ ॥

माय-बाप तूंच गणगोत तूंच ।
अगाध माहिमा वदे तुझाच ।
व्हावें प्रसन्न आता सकला ॥ ४ ॥

मूढ बुद्धि माझी मूढ गती माझी ।
कृपा ठेवी भक्तगणा तुझी ।
सोमनाथ प्रार्थी तुजला ॥ ५ ॥

卐 卐 卐

# मोक्ष

भैरवी

सत्कर्माची साथ धरी बा तू सदा ।
मायेच्या जंजाळी फसूं नको आतां ॥ ध्रु ॥

संचिताचे योगें पाप नि पुण्याची ।
सुखदुःखें आली जीवनी जगतां ॥ १ ॥

जन्मोजन्मी जैसे घडलें जें कर्म ।
पापपुण्यायीची मजा भोगी आतां ॥ २ ॥

स्वर्ग मृत्यु नरक याच जगी आहे ।
नच लागे जाणें अन्य जगी आतां ॥ ३ ॥

निंदा नि नालस्ती नको ठेवूं वाणी ।
आपणच होतो त्याचा वाली आतां ॥ ४ ॥

मानवाच्या जन्मी नोंद तुझी झाली ।
परमात्मा अंशीं वर्णी तुझी आतां ॥ ५ ॥

सत्कर्मसत्संग याचा धरी संग ।
देव धर्मावीण राहूं नको आतां ॥ ६ ॥

शांती समाधान मोक्ष्याची संपदा ।
लाभेल जीवनी याच जन्मी आतां ॥ ७ ॥

सोमनाथ सांगे नच लागे क्षण ।
जीवनास मोक्ष मिळण्यास आतां ॥ ८ ॥

# सार्थ श्रीसूक्तम्

**ॐ हिरण्यवर्णां हरिणीं सुवर्णरजतस्रजाम् ।**
**चंद्रां हिरण्यमयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ॥ १ ॥**

अर्थ–हे अग्ने सुवर्णाप्रमाणें जिची कांती आहे हरिणी प्रमाणें जी चंचल स्वभावाची आहे; सोन्याचांदीच्या पुष्पहारांनी जी नटली आहे; चंद्राप्रमाणे सुखद आणि सुवर्णालंकारांनीं शोभित असलेल्या लक्ष्मीला माझ्यासाठीं बोलाव.

**तां म आवह जातवेदो लक्ष्मीमनपगामिनीम् ।**
**यस्यां हिरण्यं विदेयं गामश्वं पुरुषानहम् ॥ २ ॥**

अर्थ–हे अग्ने जिच्यामुळें सोनें, गाई, घोडे, पुत्रपौत्रादि यांचा मला लाभ होईल अशा माझ्यापासून दूर न जाणाऱ्या लक्ष्मीला माझ्यासाठी बोलाव.

**अश्वपूर्वां रथमध्यां हस्तिनाद प्रबोधिनीम् ।**
**श्रीयं देवमुपव्हये श्रीर्मादेवीजुषताम् ॥ ३ ॥**

अर्थ–गमनाचा वेळीं जिच्यामुळें घोडे व मध्यभागी रथ आहेत, हत्तीच्या गर्जनेनें जी आल्याचे कळते अशा वैभववान देवीला मी बोलावितो ती माझ्यावर कृपा करो.

**कां सोस्मितां हिरण्य प्राकारा मार्द्रां ज्वलंतीं तृप्तां तर्पयन्तीं ।**
**पद्मे स्थितां पद्मवर्णां तामिहोपव्हये श्रीयम् ॥ ४ ॥**

अर्थ–सुहास्यवदना सुवर्णाच्या आवारात राहणारी आर्द्रा नक्षत्रावर उत्पन्न झालेली, तेजस्वी, पूर्णकाम, भक्तकामना, पूर्ण करणारी कमलनिवासी कमलवर्ण अशा लक्ष्मीला मी बोलावितो.

**चंद्रां प्रभासां यशसा ज्ज्वलन्तीं श्रीयं लोके देवजुष्टामुदाराम् ।**
**तां पद्मिनीमीं शरण महं प्रपद्येऽलक्ष्मीर्मे नश्यतां त्वां वृणे ॥५॥**

अर्थ–चंद्राप्रमाणें शीतल, परंतु तेजस्वी यशानें तळपणारी, देवांनीं सेवा केलेली, उद्धार कमळधारी देवीला मी शरण आहे. माझे दारिद्र नाहिसे व्हावे म्हणून मी तिची प्रार्थना करतो.

**आदित्यवर्णे तपसोऽधिजातो वनस्पतिस्तव वृक्षोऽथ बिल्वः ।**
**तस्य फलानि तपसानुदन्तु मांयान्तरायाश्च बाह्या अलक्ष्मीः॥६॥**

अर्थ–सूर्याप्रमाणें कांतीमान असणाऱ्या हे देवी तुझ्या तपप्रभावानें हा वेलाचा वृक्ष निर्माण झाला त्याची फळे ( फळाचे वहन केल्याने ) माझें अज्ञान आपत्ती व दारिद्र दूर करो.

**उपैतु मां देवसखः कीर्तिश्च मणिनासह**
**प्रादुर्भूतोऽस्मिराष्ट्रेऽस्मिन् किर्ति मृद्धिंददातु मे ॥७॥**

अर्थ–कुबेर कीर्ति देवता, चिंतामणी रत्नासह मला प्राप्त होवोत या देशांमध्यें जन्मलेल्या मला देव कीर्ति व समृद्धी देवोत

**क्षुत्पिपासामलां जेष्टामलक्ष्मीं नाशयाम्यहम् ।**
**अभूतिमसमृद्धिं च सर्वा निर्णुद मे गृहात ॥८॥**

अर्थ–तुझ्या कृपेनेच भूक, तहान मालिन्य व तुझी जेष्ट भगिनी दारिद्र यांचा मी नाश करतो. तूं माझ्या घरांतून सर्व दुःख दौर्भाग्य बाजूला कर.

**गंधद्वारां दुराधर्षां नित्यपुष्टां करीषिणीम् ।**
**ईश्वरीं सर्वभूतानां तामिहो पह्वये श्रियम् ॥९॥**

अर्थ–गंध रुपा जिंकण्यास कठीण, समृद्ध, गोमयपूर्ण सर्व प्राणीमात्रांची स्वामिनी अशा त्या लक्ष्मीला मी बोलावितो.

**मनसः काममाकूतिं वाचः सत्यमशीमही ।**
**पशूनां रूपमन्नस्यमयीश्रीः श्रयतां यशः ॥१०॥**

अर्थ–माझी मनोकामना, संकल्प व वाचेला सत्यत्त्व लाभावे, पशुसंपत्ति, अन्नसमृद्धि व यश सदैव माझ्याजवळ असावीत.

**कर्दमेन प्रजाभूता मयिसंभव कर्दम ।**
**श्रियंवासय–मे–कुले मातरं पद्ममालिनीम् ॥ ११ ॥**

अर्थ–हे ( श्रीपुत्र ) कर्दम माझ्यावर संतुष्ट हो, कर्दमामुळें तुझी आई पुत्रवती झाली. त्या तुझ्या कमळमाळा धारण करणाऱ्या ऐश्वर्यसंपन्न मातेला माझ्या घरी रहावयास सांग.

**आपःस्रजंन्तु स्निग्धानिचिक्लीत वस मे गृहे ।**
**निच देवीं मातरं श्रियं वासय मे कुले ॥ १२ ॥**

अर्थ–हे चिक्लीत माझ्या घरी रहा. जलप्रिय देवता माझ्या घरी मंगल कार्य निर्माण करो. ऐश्वर्यपूर्ण देवी लक्ष्मीला तुझ्या मातेला माझ्या घरी वास करावयास सांग.

**आर्द्रां यःकरिणीं यष्टिं सुवर्णां हेममालिनीम ।**
**सूर्यां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ॥ १३ ॥**

अर्थ–आर्द्र, हाती वेताची काठी घेतलेली, सुवर्णमाला धारण करणारी, सुवर्णाच्या अलंकारांनी नटलेली, सूर्याप्रमाणें दैदिप्यमान अशा लक्ष्मी देवीला हे अग्ने माझ्यासाठी बोलाव.

**आर्द्रां पुष्करणीं पुष्टिं पिंगला पद्ममालिनीम ।**
**चंद्रां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ॥ १४ ॥**

अर्थ–क्षीरसागरांतून निर्माण झाल्याने आर्द्र असलेली, हत्तीनी जिच्या मस्तकावर आपली सोंड धरलेली आहे, सर्व प्राण्यांचे यथार्थ पोषण करणाऱ्या पिंगलवर्ण असलेल्या कमळमाळा धारण करणाऱ्या सुवर्णालंकृता, चंद्राप्रमाणें आल्हादकारकतेज असलेल्या देवी लक्ष्मीला हे अग्ने माझ्यासाठी बोलव.

**तां म आवह जातवेदो लक्ष्मीनपगाममिनीं ।**
**यस्यां हिरण्यं प्रभूतं गावो दास्योश्वानाविंदेयं पुरुषानहम ॥१५॥**

अर्थ–जिच्यापासून मला पुष्कळ सुवर्ण, गाई, पशु दासदासी, घोडे व संतती प्राप्त होईल हे अग्ने अशा अविनाशी लक्ष्मीला माझ्यासाठी बोलाव.

**यः शुचिः प्रयतो भूत्वा जुहुयादाज्यमन्वहम ।**
**सूक्तं पंचदशर्चंच श्री कामः सततं जपेत ॥ १६ ॥**

अर्थ–जो नेहमी शुचिर्भूत होऊन घृताने होम करतो व पंधरा ऋचांचे हे सूत्र सतत पठण करतो तो इच्छा संपत्ती विपुलपणे प्राप्त करतो.

卐

REFBK-0022506
REFBK-0022506
मराठी ग्रंथ संग्रहालय
2369
दा. क्र.
22406

# फलश्रुति

पद्मानने पद्मऊरू पद्माक्षी पद्मसंभवे ।
तन्मेभजासि पद्माक्षी येन सौख्यं लभाम्यहम् ॥ १ ॥

अश्वदायै गोदायै धनदायै महाधने ।
धनं मेलभतां देवी सर्वकामांश्च देहिमे ॥ २ ॥

पद्मानने पद्मविपद्मपत्रे पद्मप्रिये पद्मदलायताक्षी ।
विश्वप्रिये विश्वमनोनुकुले त्वत्पादपद्मं मयिसंनिधत्स्व ॥३॥

पुत्रपौत्र धनं धान्यं हस्त्यश्वादिगवेरथम् ।
प्रजानां भवसी माता आयुष्मं तंकरोतुमे ॥ ४ ॥

धनमाग्नि र्धनंवायु र्धनंसूर्यो धनंवसुः ।
धनमिन्द्रो बृहस्पतिर्वरूणंधनमस्तुमे ॥ ५ ॥

वैनतेय सोमं पिब सोमं पिवतु वृत्रहा ।
सोमं धनस्य सोमिनोमह्यं ददातु सोमिनः ॥ ६ ॥

न क्रोधो नच मात्सर्यं न लोभो नाशुभामतिः ।
भवंति कृतपुण्यानां भक्तानां श्रीसूक्तं जपेत् ॥ ७ ॥

सरसिजनिलये सरोजहस्ते धवलतरां शुकगंधमाल्यशोभे ।
भगवति हरिवल्लभे मनोज्ञे त्रिभुवनभूतिकरि प्रसीद मह्यम् ॥८॥

विष्णुपत्नीं क्षमां देवीं माधवीं माधवप्रियाम् ।
लक्ष्मीं प्रियसखीं देवीं नमाम्यच्युतवल्लभाम् ॥ ९ ॥

महालक्ष्मीच विद्महे विष्णुपत्नीच धीमहि ।
तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात् ॥ १० ॥

# श्रीलक्ष्मी नमनाष्टक

नमस्कार महामाये, जगन्माते परात्परे ।
शंखचक्रगदाहस्ते, लक्ष्मीमाते नमोस्तुते ॥ १ ॥

आदि नाहीं अंत नाहीं, आद्यशक्ति खरोखरी ।
विश्वाधारे विष्णुकांते, लक्ष्मीमाते नमोस्तुते ॥ २ ॥

सर्वव्यापी सर्व साक्षी, शुद्धसत्व स्वरूपिणी ।
सर्वज्ञे सिंधुसंभूते, लक्ष्मीमाते नमोस्तुते ॥ ३ ॥

कमले कमलनेत्रे, कोमले कमलासने ।
मंगले मुदिते मुग्धे, लक्ष्मीमाते नमोस्तुते ॥ ४ ॥

शुभ्रवस्त्रधारिणी हे, गरुडध्वज भामिनी ।
दिव्यालंकार भूषिते, लक्ष्मीमाते नमोस्तुते ॥ ५ ॥

सर्वदुःख हरे देवी, भुजंगशयनांगने ।
भगवती भाग्यदात्री, लक्ष्मीमाते नमोस्तुते ॥ ६ ॥

सिद्धिबुद्धि भुक्तिमुक्ति, संतती सुखसंपदा ।
आयुरारोग्यहि देसी, लक्ष्मीमाते नमोस्तुते ॥ ७ ॥

नमोनमः महालक्ष्मी, धनवैभवदायके ।
दैन्य दूर करी, माझे, प्रार्थी मिलींद माधव ॥ ८ ॥

वाचितां ऐकतां भावे, नित्य या नमनाष्टका ।
इच्छिलेले मिळे सारे, सत्य श्रद्धाळु भाविका ॥ ९ ॥

## सरस्वती परमार्थ निकेतन

१४२ गोपाळ नगर, डोंबिवली पूर्व.
( जिल्हा ठाणे )

# 'श्री चैतन्यानंद योगीराज'

श्री सोमनाथ बाळशास्त्री क्षीरसागर

उर्फ

## श्री अण्णा महाराज

यांची प्रसिद्ध झालेली पुस्तकें

| | |
|---|---|
| १. पुष्प पहिले | तरंग वीणा |
| २. पुष्प दुसरे | तरंग बोल |
| ३. पुष्प तिसरे | स्मृति तरंग |
| ४. पुष्प चौथे | भाव तरंग |
| ५. पुष्प पांचवे | भक्ति तरंग |

:— पुस्तके मिळण्याचे ठिकाण —:

चैतन्यानंद **सोमनाथ बा. क्षीरसागर**

१४२ गोपाळ नगर, सरस्वती निकेतन,

डोंबिवली पूर्व ( जिल्हा : ठाणे )

**Pin Code : 421 201.**